0 2 DEC 2025

सकाळ

# संपत मोरे यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठातील क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासनातर्फे बुधवारी (ता. ३) सकाळी अकरा वाजता मराठी अधिविभागात लेखक व पत्रकार संपत मोरे यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. क्रांतिअग्रणी लाड यांच्या जयंतीनिमित्त 'प्रतिसरकारची चळवळ आणि मराठी साहित्य' या विषयावर लेखक मोरे विचार मांडणार आहेत. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार असतील.

0 2 DEC 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड



अध्यासनाच्या वतीने बुधवारी (दि. ३) सकाळी ११ वाजता मराठी अधिविभागात लेखक व पत्रकार संपत मोरे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी जी. डी. (बापू) लाड यांच्या जयंतीनिमित्त 'प्रतिसरकारची चळवळ आणि मराठी साहित्य' या विषयावर मोरे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार असतील. अभ्यासकांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

0 2 DEC 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात संपत मोरे यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासनाच्या वतीने बुधवारी (दि. ३) सकाळी ११ वाजता लेखक संपत मोरे यांचे 'प्रतिसरकारची चळवळ आणि मराठी साहित्य' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार असतील. या व्याख्यानाचा अभ्यासकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

0 2 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज




# शिवाजी विद्यापीठात बुधवारी संपत मोरे यांचे व्याख्यान

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठातील क्रांतिअग्रणी जी.डी. (बापू) लाड अध्यासनाच्या वतीने येत्या बुधवारी (दि. ३) सकाळी ११.०० वाजता मराठी अधिविभागात लेखक व पत्रकार संपत मोरे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी जी. डी. (बापू) लाड यांच्या जयंतीनिमित्त प्रतिसरकारची चळवळ आणि मराठी साहित्य' या विषयावर मोरे बोलणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार असतील. या व्याख्यानाचा जिज्ञासूंनी, अभ्यासकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

0 2 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठाचा ऋषी प्रसाद देसाई ठरला पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी २०२५ चा वेगवान धावपटू




**कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :**

जयपुर राजस्थान येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२५ मध्ये सोमवार दिनांक १ डिसेंबर ते ४ डिसेंबर अखेर अथलेटिक्स स्पर्धेला सुरुवात झाली असून यामध्ये ट्रॅक आणि फिल्ड इव्हेंट चे प्रकार त्याचबरोबर ४÷ १०० मीटर रिले मुले आणि ४÷४०० मीटर मिक्स रिले इत्यादी प्रकार होणार आहेत

आज पहिल्याच दिवशी शिवाजी विद्यापीठाने सुवर्णमय सुरुवात करत १०० मीटर धावणे या इव्हेंट मध्ये पुरुष विभागात ऋषी प्रताप देसाई याने १०.५३ सेकंदाची वेळ नोंदवत सुवर्णपदकासह या स्पर्धेतील वेगवान धावपटू होण्याचा बहुमान पटकावला

उद्या अथलेटिक्स मधील दुसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाचा मिक्स रेल्वेचा संघ सहभागी होत असून तीन व चार डिसेंबर रोजी ११० मीटर अडथळा रेस, ८०० मीटर धावणे,,भालाफेक, ३००० मीटर स्टीपल चेस, ४÷१०० मीटर रिले रेस मध्ये शिवाजी विद्यापीठ सहभागी होणार आहे

संघाचे प्रशिक्षक प्राध्यापक रामा पाटील व डॉ इब्राहिम मुल्ला तसेच संघ व्यवस्थापिका शिला मोहिते यांनी विद्यार्थ्यांचे सराव सत्र घेऊन योग्य मार्गदर्शन केले आहे व सर्व सपोर्ट स्टाफ ला आपल्या संघावर विश्वास असून सर्वच प्रकारात सर्वच खेळाडू पदक पटकावतील असा विश्वास व्यक्त केला आहे संघास पथक प्रमुख डॉ एन डी पाटील हे प्रोत्साहित करत असून आजच्या सुवर्णपदकांमुळे शिवाजी विद्यापीठाचा संघ २०० सहभागी विद्यापीठांमध्ये १० व्या क्रमांकावर आलेला आहे पथक प्रमुखांनी याबाबत पहिल्या पाचमध्ये क्रमांक पटकावण्याचा मनोदय व्यक्त केला

विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी प्रभारी प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कुलसचिव डॉ. विलास शिंदे व क्रीडा संचालक डॉ.शरद बनसोडे यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

0 2 DEC 2025

सकाळ

# 'खेलो इंडिया'त देसाई ठरला वेगवान धावपटू



ऋषी देसाई

कोल्हापूर : जयपूर येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये १०० मीटर धावणे स्पर्धेत ऋषी देसाईने १०.५३ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदकासह वेगवान धावपटू होण्याचा मान पटकाविला. ऋषी देसाई शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत असून, त्याला पथकप्रमुख डॉ. एन. डी. पाटील, प्रशिक्षक रामा पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, व्यवस्थापिका शिला मोहिते यांचे मार्गदर्शन, तर शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 DEC 2025

# शंभर मीटरमधील तिन्ही पदके राज्यात

**खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा**

अभिषेक उपाध्याय
Abhishek.Upadhyay1@timesofindia.com

जयपूर : प्रत्येक क्रीडा स्पर्धेतील १०० मीटर शर्यत आकर्षणाचा केंद्रबिंदू असते. राजस्थानमध्ये सुरू असलेल्या 'खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत' पुरुषांच्या १०० मीटर शर्यतीमधील तिन्ही पदके महाराष्ट्रातील स्पर्धकांनी जिंकली. यात कोल्हापूरपासून ७० किलोमीटर दूर असलेल्या खेडगे गावातील ऋषीप्रसाद देसाई विजेता ठरला.

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील ऋषीने १०.५३ सेकंद अशी प्रभावी कामगिरी करताना लौकिक मेलगे (सावित्रीबाई फुले विद्यापीठ - पुणे, १०.५९ सेकंद) आणि जय (सौमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई - १०.८६ से.) या महाराष्ट्रातील स्पर्धकांना मागे टाकले. 'गत स्पर्धेपेक्षा या वेळी सरस कामगिरी झाली आहे. त्यामुळे जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी निवड होईल अशी आशा आहे. गतस्पर्धा थोडक्यात हुकली होती. या वेळी निवड झाल्यास भारतीय संघातून मी खेळावे हे आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण होईल,' असे त्याने सांगितले. सुमारे दहा वर्षांपूर्वी धावण्याच्या स्पर्धेत ऋषी पहिल्यांदा खेळला त्या वेळी तो लांब पल्ल्याच्या शर्यतीत सहभागी होत असे. मात्र, जायबंदी झाल्यावर प्रशिक्षकांनी त्याला शंभर मीटर शर्यत करण्याचा सल्ला दिला.

'जायबंदी झालो, त्या वेळी आई-वडिलांनीच माझा खर्च उचलला. ते शेतात काम करतात. मात्र, तरीही माझ्या प्रगतीसाठी पैसा कमी पडणार नाही याची काळजी घेतात,' असे तो म्हणाला.

## मजुराच्या मुलाचे कुस्तीत रौप्य



अजय निंबाळकर

मजुराचा मुलगा असलेल्या अजय निंबाळकरने कुस्तीमधील महाराष्ट्राच्या कुस्तीगिरांचे एकमेव पदक जिंकले. इंदापूरच्या अजयने ग्रीको रोमन प्रकारात ५५ किलो गटात यश मिळवले. निर्णायक लढतीत त्याला कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या मनीषकुमारविरुद्ध ५-८ अशी हार पत्करावी लागली. महिलांच्या कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या समृद्धी घोरपडे (५३ किलो) आणि सृष्टी भोसलेने (६५ किलो) ब्राँझपदक जिंकले.

0 2 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ५४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवार दि. १ रोजी ५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले असून आजअखेर एकूण ५४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.




परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. सोमवारी एकाही गैरप्रकाराची नोंद झाली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून करण्यात आले आहे.

0 2 DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ५४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ५४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आलेले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी मास्टर ऑफ आर्किटेक्चर, बीएससी शुगर टेक्नॉलॉजी, बीएससी (आयटी) अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.



जनसंपर्क कक्ष
0 2 DEC 2025
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेत येथील शिवराज महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकाविला.

# शिवाजी विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत शिवराज महाविद्यालय तृतीय

**गडहिंग्लज :** दौलतराव आहेर इंजिनिअरिंग कॉलेज कराड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेत येथील शिवराज महाविद्यालयाच्या पुरुष संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. या सामन्यामध्ये बलाढ्य एस. बी. एम. कॉलेज रहीमतपूर संघाचा ३–० अशा गोल फरकाने एकतर्फी विजय मिळवला.

संघात कुपिंदर पोवार, सुरज कोंडुसकर, श्रावण जाधव, सौरभ हुलसार, सौरभ मोहिते, अमर गवळी, मारुती कोळी, ओमकार बेळगुंदकर, आर्यन दळवी, सागर पोवार, राहुल पोवार, यश खोत, प्रसाद पोवार, ओमकार पाटील, प्रवीण पोवार, तेजस शेंडे, तुषार कांबळे, प्रशांत सलवादे, आकाश देसाई, संदीप हिरेकुडी यांचा समावेश आहे. विजयी खेळाडूंना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, संचालिका बिनादेवी कुराडे, संचालक विश्वजित कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन तर क्रीडाशिक्षक डॉ. राहुल मगदूम, जयवंत पाटील, किरण कावणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

0 2 DEC 2025
सकाळ

# विद्यापीठाने दोन दिवसांतील परीक्षा पुढे ढकलल्या

## नगरपालिका निवडणूक मतदान, मतमोजणीमुळे निर्णय

कोल्हापूर, ता. १ : नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीतील मतदान आणि मतमोजणीमुळे शिवाजी विद्यापीठाने आजपासून पुढील दोन दिवसांतील हिवाळी सत्रातील परीक्षा पुढे ढकलल्या. त्यात बी. ए., बी. कॉम., आदी अभ्यासक्रमांचा समावेश असून, या परीक्षा डिसेंबर अखेरीस घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

नगरपरिषद, नगरपंचायतीसाठी उद्या, मतदान आणि बुधवारी मतमोजणी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने आजपासून पुढील दोन दिवसांतील बी. ए., बी. कॉम., बीसीए., बीबीए. भाग दोन, एम. ए., एम. कॉम., या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

दरम्यान, हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा तीन नोव्हेंबरपासून सुरू झाल्या आहेत. आज एम. आर्किटेक्चर सत्र तीन, बीएस्सी शुगर टेक्नॉलॉजी सत्र पाच आणि सहा, बीएस्सी आयटी सत्र पाच आणि सहा या अभ्यसाक्रमांच्या परीक्षांचे निकाल विद्यापीठाने जाहीर केले आहेत.